*"Knowledge Scholar"*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 06, Nov.-Dec. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

# दूरचित्रवाणीवरील सूत्रसंचालनः एक कला

**रवींद्र दादाराव तायडे**
संशोधक एम.फील.
जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**प्रस्तावना -**

शब्द, भाषा, संदेश महत्वाचे: कारण याद्वारेच व्यक्ती दुसऱ्यांशी संवाद साधू शकते. जनसंवाद प्रक्रियेत माध्यमांच्या इतिहासावर एक धावती नजर टाकली तर लक्षात येईल की, माणसाला जेव्हा दुसऱ्या माणसाशी संवाद साधण्याची गरज भाली. तेव्हाच माध्यमांचा जन्म झाला. 'संवादाचे पहिले क्रांतिकारक साधन ठरले 'शब्द'. शब्दांच्या माध्यमातला संदेश अधिकाधिक व्यक्तीपर्यंत प्रभावीपणे पोहचावा यासाठी संशोधकांनी निरनिराळी तंत्रे शोधून विकसित केली. यातीलच एक तंत्र म्हणजे दूरचित्रवाणी! इ.स. १९२६ मध्ये जॉन लॉगी बेअर्ड यांनी दूरचित्रवाणीचा शोध लावला. १९२८ मध्ये त्यांनी रंगीत दूरचित्रवाणी विकसित केली. यानंतर जवळ जवळ ३१ वर्षांनी म्हणजे इ.स. १९५९ साली भारतामध्ये दूरचित्रवाणीची दूरदर्शन वाहिनी सुरू झाली. यात काळानुसार सुधारणा होत होत आज दूरचित्रवाणीच्या अनेक वाहिन्या आपल्या सेवेद्वारे प्रेक्षकापर्यंत पोहोचल्या आहेत. दूरचित्रवाणी वाहिन्यांची संख्या वाढल्यामुळे त्यांच्या स्पर्धा निर्माण झाली. यातूनच प्रेक्षकांना आपल्याकडे आकर्षित करून घेण्यासाठी एकापेक्षा एक सरस कार्यक्रम या वाहिन्या प्रेक्षकांसमोर सादर करीत आहोत. सोनी टी.व्ही. वरील 'इंडियन आयडल' कार्यक्रम असो की 'स्टार वन' वरील द ग्रेट इंडियन लॉफ्टर चॅलेंज' कार्यक्रम असो या सर्वांचा उद्देश प्रेक्षक वर्गाला आपल्याकडे आकर्षित करण्याचा आहे. अशा

कार्यक्रमाचे प्रभावी सादरीकरण करण्याचे, कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन करण्याचे काम सूत्रसंचालकाला अर्थातच संवादकाला करावे लागते. कार्यक्रमाला योग्य दिशा देण्याचे काम संवादकाला करावे लागत असल्याने कार्यक्रमरूपी रथाचा सारथी संवादकाला म्हटले जाते. त्याच्या प्रभावी सादरीकरणावरच कार्यक्रमाचे खरे यशापयश अवलंबुन असते.

**विषय विवेचन -**

माध्यमांच्या क्षेत्रात इलेक्ट्रॉनिक प्रसारमध्यमांचे वर्चस्व आहे. एकाच वेळी कोट्यवधी व्यक्तींशी संवाद साधणे या माध्यमांमुळे शक्य झाले आहे. दूरचित्रवाणी वाहिन्यांची संख्या वाढल्याने स्पर्धा निर्माण होऊन त्यात आपले अस्तित्व टिकविण्यासाठी वाहिन्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करू लागल्या. आयोजित कार्यक्रमाच्या सादरीकरणाची धुरा संवादकाला सांभाळावी लागते. तमाम प्रेक्षकवर्गाला खिळवून ठेवणे, कार्यक्रमाची रंगत वाढविणे आणि प्रसंगावधान ओळखून कधी कधी येवू घातलेला बाका प्रसंग निभावून नेत हसत हसत, हसवत हसवत कार्यक्रम यशस्वीततेला नेण्याची कसरत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणाऱ्या संवादकाला करावी लागते.

हजारो, लाखो प्रेक्षकांसमोर एखाद्या कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन करणारा संवादक कसा असावा याविषयी संवादकाच्या अंगी खालील गुण असावेत.

१. संवादकाला बोली माध्यमाची जाण असावी.

२. उत्तम व गोड वाणी असावी.

३. प्रसन्न व्यक्तिमत्व व प्रेक्षकांशी सुसंवाद साधण्याची कला अवगत असावी.

४. त्याचे भाषेवर प्रभुत्व असावे.

http://www.ksijmr.com

५. सुस्पष्ट आवाज असावा.

६. त्याला प्रेक्षकाची नाडी ओळखता यावी.

७. त्याच्या सादरीकरणात जिवंतपणा असावा.

८. त्याला सामाजिक, आर्थिक, राजकीय व इतर घडामोडींची माहिती असावी.

९. तो अष्टावधानी असावा.

१०. प्रसंगावधानी असावा.

सध्या भारतात स्टार, आजतक, झी न्यूजसारख्या मोजक्या वाहिन्या सोडल्या तर इतरत्र 'वृत्तनिवेदक' बातम्या सांगतात. वर उल्लेख केलेल्या वाहिन्यांवर 'पत्रकार' स्वत:च निवेदक असल्याने त्यांना 'संवादक' म्हणतात. वृत्तसंवादक आपल्या जबाबदाऱ्या पेलून संवादकाचीही कामगिरी बजावीत असतो. तेव्हा त्याला अष्टावधानी असावे लागते. आपल्या कामगिरीवर दिवसभरात अनेकांनी केलेल्या कामाचे चीज होणार आहे, हे त्याने लक्षात ठेवणे गरजेचे आहे. आपण पडद्यावर दिसत असलो, सगळे आपल्याला ओळखत असले, आपण बातम्या देत असलो तरी हे सगळे करतांना आपण एक व्यक्ती नसून प्रभावी 'माध्यम' आहोत, याचे भान तयाने ठेवायला हवे.

वरील सर्व गुणसंपन्न व्यक्ती कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन करण्यात तरबेज असतात. दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्या प्रेक्षकांच्या मनोरंजनाबरोबरच आपली प्रेक्षक संख्या वाढविण्यासाठी अनेक स्पर्धात्मक कार्यक्रम सादर करीत आहेत. सोनी वाहिनीवर नवोदित गायकांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी 'इंडियन आयडल' कार्यक्रम दाखवला जातो. सोनू निगम, अनू मलिक व फराह खान परीक्षक असलेल्या या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी अमन वर्मा व मिनी माथूर यांनी यशस्वीपणे सांभाळली आहे. स्टार वन वाहिनीवरील 'द ग्रेट इंडियन लॉफ्टर चॅलेंज' या हास्यविनोदी

खजाना असलेल्या कार्यक्रमात हास्यसम्राट शेखर सुमन व नवज्योतसिंग सिध्दू हे परीक्षक असतात. तर कार्यक्रमाची सूत्रसंचालक म्हणून परिझाद कोल्हा आपल्या प्रसन्न व्यक्तिमत्वाने आणि हसतमुख मुद्रेने प्रेक्षकांसमोर कार्यक्रमाचे सादरीकरणाचे काम करीत असते. मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरील 'दम दमा दम' या नाचगाण्याच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिवांगी निर्गुण यशस्वीपणे करीत आहे. याच वाहिनीवरील 'सपट महाचर्चा' हा विविध विषयावर जनता व प्रशासन किंवा सरकार यांच्यामध्ये चर्चा घडवून आणणारा कार्यक्रम या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आपल्या जबरदस्त आवाज आणि भाषाशैलीच्या जोरावर नितीन केळकर समर्थपणे पार पाडत आहे. ज्या विषयावर चर्चा घडवून आणली जाते त्या विषयाचे ज्ञान, माहिती संवादकाला असावी लागते. वाहिन्यांच्या या स्पर्धेच्या युगात विविध बक्षिसांचा समावेश असलेले कार्यक्रमाचे आयोजन देखील करण्यात येत आहे. सोनी वाहिनीवरील 'डिल या नो डील' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंदिरा बेदी समर्थपणे करीत असल्याचे दिसून येते तर सहारा वनवरील 'डायल वन और जितो' कार्यक्रमादरम्यान संवादक मंदिरा बेदी अधून मधुन उपस्थित प्रेक्षकांना सुसंवादाद्वारे खिळवुन ठेवीत असल्याचे आढळुन येते. स्टार वन वाहिनीवरील 'सुपर सेल' या कार्यक्रमाचे संवादक साजीद खान देखील प्रेक्षकांना चित्तवेधक भाषाशैलीने प्रोत्साहित करीत असतात.

दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्यासाठी चित्रपटातील नट - नट्या देखील संवादक म्हणून पुढे येत आहेत. मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरील 'रामबंधू सह्याद्री अंताक्षरी' या गाण्याच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिध्द मराठी नाट्य व चित्रपट कलाकार प्रशांत दामले सोबतीला निलम शिर्के करीत आहे. तर याच वाहिनीवरील 'एम टू, जी टू' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठीची आघाडीची नायिका वर्षा उसगावकर आपल्या अभिनव कलागुणांनी करीत आहे. फिल्मी चॅनेलवरील

'रॉकी मेरा नाम'चे सूत्रसंचालन सिने अभिनेता चंकी पांडे खेळीमेळीच्या वातावरणात करतो तर स्टार वाहिनीवरील 'कौन बनेगा करोडपती'चे सुपरस्टार अमिताभ बच्चन आपल्या खास शैलीत सूत्रसंचालन करतो. अँकर म्हणून भूमिकेशी शंभर टक्के प्रामाणिक राहून स्वत:च सुपरस्टारपद मिळविण्यापेक्षा अमिताभने 'हॉटसीट' पासून दूर जात अमिताभ भारतीय घरातला अविभाज्य घटक बनला. त्याच्या या प्रभावी अँकरशीपमुळेच '२००५ चा' बेस्ट अँकरचा 'पुरस्कार देखील अमिताभला मिळाला. संगीत क्षेत्रातील उद्योन्मुख, होतकरू कलावंतांच्या कलागुणांना संधी देवून महाराष्ट्रातील युवा प्रतिभेला व्यासपीठ मिळवुन देण्याच्या उद्देशाने मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर 'महाराष्ट्र संगीत रत्न' या एका अनोख्या कार्यक्रमाला येत्या काही दिवसातच सुरूवात होणार आहे. अशा या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची धुरा प्रसिध्द मराठी अभिनेता सुबोध भावे आणि प्रसिध्द गायिका बेला शेंडे सांभाळणार आहे.

हजारो, लाखो प्रेक्षकांसमोर एखाद्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणाऱ्या संवादकाची भूमिका दिसायला जेवढी सोपी दिसते तेवढी ती नक्कीच नसते. कार्यक्रमादरम्यान किंवा अन्य कारणांमुळे फजितीची वेळ येत असते तेव्हा प्रसंगावधान ओळखून त्यातून त्याला स्वत:ची सुटका करून घ्यावी लागते. असाच प्रसंग एकदा दूरदर्शनच्या कार्यक्रमात राजा गोसावी यांची मुलाखत घेतांना सुधीर गाडगीळ यांच्यावर आला होता. गाडगीळ यांनी विचारलेल्या प्रश्नावरच प्रतिप्रश्न करून गोसावी त्याची फिरकी घेत. गाडगीळने त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली असती तर लोक म्हणाले असते की, आम्ही राजा गोसावींना ऐकायला आलोत की सुधीर गाडगीळांना आणि उत्तर दिली नाी तर गाडगीळला उत्तर देता येत नाही, असा लोकांना समज झाला असता, अशा दुहेरी कोंडीत गाडगीळ अडकले होते.

तेव्हा त्यांनी प्रसंगावधान राखून गोसावींना अवांतर असा नाटकाचा प्रश्न विचारून स्वत:ची सुटका करून घेतली.

एकदा दूरदर्शनवरील बातम्या वाचतांना प्रदीप भिडे या निवेदकाने ८० सेंटीमिटरऐवजी ८० मीटरची पाईपलाईन फुटल्यासंबंधीची बातमी वाचली आणि स्वत:ची फजिती कार्यक्रम 'लाईव्ह' असल्यामुळे टाळु शकले नाही.

**निष्कर्ष -**

दूरचित्रवाणीच्या वाहिन्यांमध्ये स्पर्धा वाढल्यामुळे एकापेक्षा एक सरस कार्यक्रमांची यातुन निर्मिती होत आहे. या कार्यक्रमाला योग्य दिशा देण्यासाठी, कार्यक्रमाचे महत्त्व पटवुन देण्यासाठी सूत्रसंचालनाचे काम संवादकाला करावे लागत आहे. संवादक आपल्याकडे असणारा भाषेचा फुलोरा समोरच्या व्यक्तीवर प्रभाव पाडण्यासाठी वापरतांना दिसून येतो. तसेच सूत्रसंचालनाच्या क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण वाढत आहे. बहुतांश कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करतांना स्त्रिया आढळुन येतात. त्याचप्रमाणे मोठया पडद्यावरील सिने कलाकार छोटया पडद्यासारख्या दूरचित्रवाणीच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्याकडे वळत असल्याचे दिसून येते किंबहुना लाखो प्रेक्षकांची गर्दी खेचून आणण्यासाठी सिने कलाकारांकडे कार्यक्रमांच्या सूत्रसंचालनाची सूत्रे सोपविली जात असावी. आजच्या जागतिकीकरण, आधुनिकीकरण, व्यापारीकरण व स्पर्धात्मक युगाच्या काळात दूरचित्रवाणीवरील सुत्रसंचालनाचे व्यावसायीकरण झाले असले तरी तो एक प्रभावी व उत्तम कला आहे.

http://www.ksijmr.com

**संदर्भ -**

१. पत्रकारिता विद्या, संपादक - गोखले किरण.

२. हॉर्निमन शोध पत्रिका १९९९-२०००, पान नं. २.

३. उपरोक्त कित्ता (चित्रगंध पुरवणी - १८ फेब्रुवारी २००६).

४. उपरोक्त कित्ता, पान नं. १००.

५. उपरोक्त कित्ता, पान नं. १००.

६. साप्ताहिक लोकप्रभा, १५ जुलै २००५, पान नं. ५६.

७. दैनिक लोकमत, चित्रगंधा पुरवणी १८ फेब्रुवारी २००६.

८. पत्रकारिता विद्या, उपरोक्त कित्ता, पान नं. १००.

९. साप्ताहिक लोकप्रभा, ३० डिसेंबर, २००५, पान नं. ४४.

१०. साप्ताहिक लोकप्रभा, ३० डिसेंबर, २००५, पान नं. ४१.